दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक ५३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२४ मे २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

### केंद्राने राज्याचे जीएसटीचे २६ हजार कोटी थकविले

## थकबाकी अदा केल्यास राज्यातील अनेक विकासकामे मार्गी लागतील : खा. राजन विचारे



**दै.रायगड नगरी । उरण**

केंद्र सरकारकडे राज्याचे जीएसटीची २६ हजार कोटी रुपये थकवले आहेत. केंद्राने राज्याच्या आकसापोटी थकित ठेवलेली रक्कम तत्काळ अदा केल्यास राज्यातील अनेक विकासकामे मार्गी लागतील अशी कडवट टीका खासदार राजन विचारे यांनी उरण येथील आयोजित शिवसंपर्क अभियान अंतर्गत जाहीर सभेतून केली.

राज्यातील पहिल्या टप्प्यातील खासदार, आमदार, पक्षप्रमुख यांच्या विदर्भ, मराठवाडा, खानदेश आदी भागातील शिवसंपर्क अभियानानंतर खासदार राजन विचारे यांच्या नेतृत्वाखाली शिवरायांच्या पावनभुमीतुन रायगड जिल्ह्यात दुसऱ्या टप्प्याला सुरुवात झाली आहे. उरण विधानसभा मतदारसंघातील उलवे नोड येथुन शिवसंपर्क अभियानाला सुरुवात झाली. त्यानंतर गव्हाण, कोपर, जासई, चिरनेर येथून थेट उरण येथील युईएस स्कूलच्या सभागृहात शिवसंपर्क अभियाना निमित्ताने जाहीर सभा झाली.

यादरम्यान गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक या अभियानाअंतर्गत १५० मोटारसायकल स्वारांनी घोषणाबाजी करत रॅलीही काढली होती. त्यानंतर उरण शहरातील युईएस शाळेच्या सभागृहात जाहीर सभाही घेण्यात आली.या जाहीर सभेत पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना खासदार राजन विचारे यांनी केंद्र सरकार व राज्यातील विरोधी पक्षांवर जोरदार टीका केली. नवी मुंबई विमानतळाच्या पायाभरणी समारंभाच्या उद्घाटनासाठी आलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विमानतळाच्या नामकरणासाठी येथील भाजपच्या एकाही नेत्यांने मागणी पत्र दिलेले नाही.


आता मात्र नावासाठी जनतेची दिशाभूल करण्याचे काम केले जात असल्याचा आरोप येथील भाजप नेत्यांवर खासदार राजन विचारे यांनी केला. दिबांचा साडेबारा टक्के भूखंड वाटप आणि प्रकल्पग्रस्तांनी बांधलेल्या नैसर्गिक गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्यासाठी मागील ३० वर्षांपासून लढा सुरू होता. मात्र प्रकल्पग्रस्तांची गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याचा निर्णय घेऊन महाआघाडी सरकारने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्न सोडवुन न्याय देण्याचे काम केले आहे. नैसर्गिक आपत्ती, वादळे, कोरोना या काळात आरोग्य सेवा बळकट करण्याचे कामही मुख्यमंत्र्यांनी महाआघाडीच्या सरकारच्या माध्यमातून केले आहे.

आगामी नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत एकजूट होऊन लढविण्यासाठी आणि भगवा फडविण्यासाठी पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवसैनिकांनी सज्ज होण्याचे आवाहनही खासदार राजन विचारे यांनी जाहीर सभेतून केले. यासाठी महाआघाडीच्या सरकारच्या माध्यमातून राज्यात केलेल्या विकासकामांची माहिती लेखाजोखा जनतेपर्यंत घराघरात पोहचविण्याचे आवाहनही .../२

# मंकीपॉक्स व्हायरसने वाढवली चिंता, मुंबई विमानतळावर अलर्ट

**दै.रायगड नगरी । मुंबई**

जगात कोरोनानंतर आता एक नवीन संसर्ग वेगाने पसरत आहे, ज्याचे नाव 'मंकीपॉक्स' आहे. ताज्या अहवालानुसार, आतापर्यंत जगभरात मंकीपॉक्सचे ९० हून अधिक रुग्ण आढळले आहेत. हे सर्व रुग्ण यूके, युरोपियन देश, उत्तर अमेरिका आणि ऑस्ट्रेलियासह १२ देशांमध्ये आढळून आले आहेत. मात्र, भारतात अद्याप एकही केस आढळलेला नाही. दरम्यान, मंकीपॉक्स व्हायरसबाबत मुंबईविमानतळ आणि मुंबई महापालिका सतर्क आहे.



यासंदर्भात मुंबई महापालिकेने आदेश जारी करताना म्हटले आहे की, ज्या लोकांनी आफ्रिकन देश आणि इतर देशांतून प्रवास केला आहे, जेथे मंकीपॉक्सची लक्षणे आढळली आहेत, त्या लोकांची चाचणी करणे आवश्यक आहे. मुंबई विमानतळालाही प्रवाशांची तपासणी करण्यास सांगितले आहे. दरम्यान, यापूर्वी केंद्र सरकारने 'नॅशनल सेंटर फॉर डिसीज कंट्रोल' आणि 'इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च' यांना मंकीपॉक्सबाबत सतर्क राहण्यास सांगितले आहे. तसेच, मंकीपॉक्स व्हायरसबाबत महाराष्ट्रात राज्य सरकारने देखील ॲडव्हायझरी जारी केली आहे.

तज्ज्ञांच्या मते 'मंकीपॉक्स' हा एक दुर्मिळ विषाणू आहे. ताप आलेल्या व्यक्तीमध्ये जे सामान्य लक्षणे दिसतात, तीच लक्षणे यात दिसून आली आहेत.

यामध्ये संक्रमित व्यक्तीच्या संपूर्ण शरीरावर आणि चेहऱ्यावर पुरळ दिसू लागते. याशिवाय, ताप, स्नायू दुखणे, डोकेदुखी, थंडी वाजून येणे आणि थकवा अशी लक्षणे दिसू शकतात. संक्रमित व्यक्तीच्या संपर्कात आलेल्या लोकांना या विषाणूचा संसर्ग होऊ शकतो. हा विषाणू त्वचा, श्वसनमार्गातून किंवा डोळे, नाक आणि तोंडातून आपल्या शरीरात प्रवेश करू शकतो. तसेच, संक्रमित प्राणी देखील या विषाणूचे सक्रिय वाहक असू शकतात. अशा प्राण्याच्या संपर्कात आल्याने, किंवा विषाणू-दूषित वस्तूंद्वारे देखील मंकीपॉक्स पसरू शकतो. डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगोमध्ये मंकीपॉक्सची सर्वाधिक प्रकरणे आढळतात. मुख्यतः आंतरराष्ट्रीय प्रवासामुळे किंवा आयात केलेल्या प्राण्यांमुळे हा विषाणू पसरतो.

मंकीपॉक्सचे रुग्ण अमेरिका, ब्रिटन, इटली, स्पेन, पोर्तुगाल, स्वीडन, कॅनडा, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशांत आढळले आहेत. आतापर्यंत ९० हून अधिक रुग्ण या देशांमध्ये सापडले आहेत. सुदैवाने तूर्त तरी भारतात या आजाराचा एकही रुग्ण नाही.

## अपघातात एक ठार दोन जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका चार चाकी गाडीचा टायर फुटून गाडीला झालेल्या अपघातात गाडीतील एक ठार तर दोघे जण जखमी झाल्याची घटना पनवेल जवळील पुणे - मुंबई एक्स्प्रेस लेन वर कि .मी . ९/६०० येथे सोमवारी सकाळी ५.४५ या वेळी घडली आहे.

पुणे बाजू कडून चालक कल्पेश सुभाष शेवाळे ( वय २७ ) हा त्याच्या ताब्यातील व्हॅगनर गाडी क्रमांक एम एच ०२ बी आर ४८७२ ही घेऊन पुणे बाजू कडून मुंबई बाजू कडे जात असताना पनवेल जवळील पुणे - मुंबई एक्स्प्रेस लेन वर कि .मी . ९/६०० येथे त्याच्या गाडीचा एक टायर फुटल्याने गाडीवरील ताबा सुटून झालेल्या अपघातात गाडीत असलेला त्याचा मोठा भाऊ तेजस शेवाळे ( वय २८ ) हा जखमी होऊन मयत झाला आहे, तर तेजस याची पत्नी सोनल शेवाळे ही व कल्पेश हे दोघे जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# ओबीसी आरक्षणासंदर्भात ठाकरे महाविकास आघाडी सरकार अद्यापही निद्रिस्त

### निष्क्रिय कारभाराचा पनवेलमध्ये लाक्षणिक उपोषण करून जाहीर निषेध

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**महाराष्ट्रात ओबीसी आरक्षणासंदर्भात ठाकरे महाविकास आघाडी सरकार अद्यापही निद्रिस्त अवस्थेत आहे. महाविकास आघाडी सरकारच्या निष्क्रिय कारभारामुळे राज्यातील ओबीसी समाजाला आरक्षणापासून वंचित रहावे लागले असून या निष्क्रिय कारभाराचा आज पनवेलमध्ये उपोषण करून जाहीर निषेध करण्यात आला. मध्य प्रदेश सरकारने सर्वोच्च न्यायालयात ओबीसींचे आरक्षण पुनर्स्थापित केले त्याप्रमाणे महाराष्ट्र सरकार का करू शकत नाही याचा जाब या आंदोलनातून सरकारला विचारण्यात आला.**



राज्यातील महाविकास आघाडी सरकारने ओबीसी समाजाच्या आरक्षणाची राजकीय हत्या करून ओबीसी समाजास दडपण्याचे षडयंत्र रचले आहे. त्या निषेधार्थ तसेच मध्य प्रदेश सरकारप्रमाणे महाराष्ट्र सरकारला लोकशाही मार्गाने ओबीसींचे राजकीय आरक्षण पुनर्स्थापित करण्यास भाग पाडण्यासाठी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष आमदार योगेश टिळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भाजप ओबीसी मोर्चातर्फे आज (दि. २३) पनवेल प्रांत कार्यालय येथे एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. तसेच ओबीसी आरक्षण लागू करण्यासाठी राज्य सरकारने तातडीने पाऊले उचलावीत, असे निवेदन यावेळी प्रांत अधिकारी मार्फत राज्य सरकारला देण्यात आले.

सर्वोच्च न्यायालयाने ०४ मार्च २०२१ रोजी महाराष्ट्रातील ओबीसी राजकीय आरक्षण स्थगित करतानाच ते पुन्हा लागू करण्यासाठी ही तिहेरी चाचणी पूर्ण करण्यास सांगितले होते. मात्र राज्यातील महाविकास आघाडी सरकारने नेमके हेच काम केले नसल्याने राज्यातील ओबीसी राजकीय आरक्षण पुन्हा लागू होत नाही. आणि दुसरीकडे मध्य प्रदेश मधील भाजप सरकारने न्यायालयाच्या आदेशानंतर ताबडतोब डेटा गोळा करून चाचणी पूर्ण केली व ओबीसी आरक्षण पुन्हा मिळवले. मध्य प्रदेशमधील भाजपा सरकारच्या यशानंतर महाविकास आघाडी सरकारचे अपयश पुन्हा स्पष्ट झाले आहे. असे असतानाही सत्तेसाठी जनतेची दिशाभूल करण्याचे काम ठाकरे सरकार करत आहे. ओबीसींना राजकीय आरक्षण देताना ते किती प्रमाणात द्यावे हा प्रश्न आहे व त्यासाठी समर्पित आयोगामार्फत एंपिरिकल डेटा अर्थात ओबीसींची वस्तुस्थितीनुसार आकडेवारी गोळा करून प्रमाण ठरवणे आणि एकूण आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादेत ठेवणे गरजेचे आहे. एंपिरिकल डेटा गोळा करून तिहेरी चाचणी पूर्ण केली की ओबीसी राजकीय आरक्षण परत मिळणार हे सर्वोच्च न्यायालयाच्या ०४ मार्च २०२१ च्या निकालापासूनच स्पष्ट होते. परंतु आता मध्य प्रदेशचा निकाल आल्यावर नवा शोध लागल्यासारखे या सरकारचे मंत्री महाराष्ट्रालाही आपोआप आरक्षण मिळेल अशी खोटी आस महाराष्ट्राला देत आहेत. दरम्यान जानेवारी महिन्यात राज्याचे गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांनी एका .../२

# पनवेल रेल्वे स्थानकात पिस्तूलाची विक्री करण्यासाठी आलेला गुन्हेगार गजाआड

### 3 लाख ४७ हजार १०० रूपये किंमतीची ०४ पिस्तुले व ४ जिवंत काडतुसे हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशन येथे बेकायदेशिररित्या पिस्तुलांची विक्री करण्यासाठी आलेल्या गुन्हेगाराला अटक करण्यात आलेली आहे. सदर अटक आरोपीकडुन ३ लाख ४७ हजार १०० रूपये किंमतीची एकुण ०४ पिस्तुले व चार जिवंत काडतूसे हस्तगत करण्यात आलेली आहेत. सदरची धडक कारवाई गुन्हे शाखा कक्ष ०२ पनवेल यांच्याकडून करण्यात आली आहे.

बेकायदेशिररित्या अग्नीशस्त्रांची विक्री करण्यासाठी येणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई करण्याबाबत नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह, सह पोलीस आयुक्त डॉ. जय जाधव, अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) महेश घुर्ये, पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा) सुरेश मेंगडे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) विनायक वस्त यांनी वेळोवेळी आढावा घेऊन विशेष मोहिम राबवुन बेकायदेशिररित्या अग्नीशस्त्रांची विक्री करण्यासाठी येणाऱ्या गुन्हेगारांच्या मुसक्या आवळून वेळीच प्रतिबंध करण्याबाबत आदेश दिले होते.

त्याअनुषंगाने एक इसम पनवेल रेल्वे स्टेशन परीसरात बेकायदेशिररित्या पिस्तुलांची विक्री करण्यासाठी येणार असल्याबाबत गोपनिय बातमीदाराकडुन गुन्हे शाखा, कक्ष ०२ यांना माहिती प्राप्त झाली होती. या माहितीच्या अनुषंगाने पडताळणी करून कारवाई करण्याबाबत वरिष्ठांनी दिलेल्या आदेशानुसार गुन्हे शाखा कक्ष २, पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची दोन पथके तयार करून पनवेल रेल्वे स्टेशन परीसरात सापळा रचण्यात आला होता. गोपाल राजपाल भारद्वाज



(वय २२) याला पळून जाण्याच्या तयारीत असताना गुन्हे शाखा कक्ष २ च्या पथकांनी शिताफीने ताब्यात घेतले.

त्यानंतर अटक आरोपीकडे असलेल्या बॅग (सॅक) ची तपासणी केली असता त्यामध्ये देशी बनावटीचे ०४ पिस्तुल व ०४ जिवंत काडतुसे सापडली. सदर आरोपिंविरुध्द पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढिल तपास गुन्हे शाखा कक्ष २, पनवेल हे करीत आहेत. .../२

### संक्षिप्त...

## १४ महापालिकांच्या निवडणुकीचा आरक्षण सोडत कार्यक्रम जाहीर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील महापालिका निवडणुकांसदर्भात महत्वाचं परिपत्रक जारी केलं आहे. राज्य निवडणूक आयोगानं मुंबईसह १४ महापालिकांसाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या ओबीसी राजकीय आरक्षणासंदर्भातील निर्णयानंतर राज्य निवडणूक आयोगाकडून निवडणुकीची तयारी आता सुरु करण्यात आली आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकाची अंतिम प्रभागरचना देखील प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसंच नवी मुंबई, वसई विरार, उल्हासनगर, कोल्हापूर, अकोला, अमरावती, नागपूर, सोलापूर, नाशिक, पुणे, पिंपरी चिंचवड, कल्याण डोंबिवली आणि ठाणे महापालिकेच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

# उरण तालुक्यातील गावात शिरणार पावसाचे पाणी

**दै.रायगड नगरी । उरण**

पावसाळा सुरू होण्यास काही दिवसांचा कालावधी उरला आहे.तरी ही स्थानिक ग्रामपंचायतीने आजतागायत आप आपल्या हद्दीतील गटारातील गाळ, नाल्यातील झाडे, झुडपे यांची साफसफाई केली नाही. सिडकोने सिडको बाधित ग्रामपंचायत हद्दीतील नाल्यांची साफसफाई केली नाही. तसेच खाडी किनाऱ्यावरील होर्डींग पाईपची साफसफाई केली नाही. त्यात काही भांडवलदारानी, व्यवसायिकांनी रस्त्या लगतच्या मोऱ्यांच्या तोंडावरच दगड मातीचा भराव टाकण्याचा प्रताप तलाठी, मंडळ अधिकारी यांच्या देखरेखीखाली सुरू केला आहे.त्यामुळे यावर्षी पावसाचे पाणी तालुक्यातील अनेक गावांत शिरण्याचा धोका निर्माण झाला आहे.

रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री अदितीताई तटकरे यांनी बैठकीच्या माध्यमातून यावर्षी उद्भवणाऱ्या पूर परिस्थिती वर उपाययोजना करण्याचा आढावा बैठकीच्या माध्यमातून घेतला आहे.तसेच पावसाळ्यापूर्वी प्रत्येक प्रभागातील, गावातील कामे मार्गी लावण्यासाठी संबंधित अधिकारी वर्गांना आदेश जारी केले आहेत. परंतु संबंधित शासकीय अधिकारी वर्गानी पालकमंत्र्यांच्या आदेशाची अंमलबजावणी न करता आप आपल्या परिसरातील गटारातील गाळ, नाल्यातील झाडे, झुडपांची साफसफाई केली नाही. सिडकोने सिडको बाधित ग्रामपंचायत हद्दीतील खाडी किनाऱ्यावरील होर्डींग पाईपची साफसफाई केली नाही.

त्यात काही भांडवलदार आणि व्यावसायिक यांनी तलाठी व मंडळ अधिकारी वर्गाच्या कृपा आशिर्वादाने रस्त्याच्या व खाडी किनाऱ्यावरील मोऱ्यांच्या तोंडावरच दगड, मातीचा भराव टाकून पावसाचे पाणी वाहून नेणारे नैसर्गिक स्त्रोत बंद करण्याचा प्रताप केला आहे. त्यामुळे उरण तालुक्यातील चिरनेर, विंधणे, दिघोडे, वेश्वी, चिर्ले, जासई, पागोटे, नवघर, बोकडविरा, भेंडखळ, म्हातवली, कोप्रोली, बांधपाडा सह इतर ग्रामपंचायत हद्दीतील गावात पावसाचे पाणी शिरुन पुर परिस्थिती निर्माण होण्याचा धोका निर्माण झाला आहे. तरी कागदावर झालेल्या गटार, नाले सफाई वर विश्वास न ठेवता पालकमंत्री अदितीताई तटकरे यांनी प्रत्यक्षात पाहणी करावी अशी मागणी पुरग्रस्त नागरीक करत आहेत.



# अल्पवयीन मुलीवर बलात्कार आणि जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या नराधमास जन्मठेप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर येथील पिडीतेच्या राहत्या घरात घुसून जबरदस्तीने पिडीतेवर बलात्कार करणाऱ्या आणि तिचा गळा दाबून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणारा आरोपीस सत्र न्यायालयाने आजीवन कारावास आणि २२ हजारांची शिक्षा सुनावली.

खारघर येथे ८ वर्षीय पिडीत मुलगी तिचे आई-वडील व लहान भावासह राहत होती. तिचे आई-वडील हे कामानिमित्त घराबाहेर गेले असता बाहेरील इसम नामे जान अन्वर आलम हा पिडीतेच्या भरात शिरला आणि पिडीतेचे कपडे वर करून तिच्यावर जबरदस्ती करू लागला. पिडीता आरडाओरड करू लागली असता आरोपीने तिचा गळा दाबुन बेशुध्द केले व तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर खेळण्याकरिता बाहेर गेलेला पिडीतेचा लहान भाउ घरी परत आला असता त्याने तिला बेशुध्द अवस्थेत पडलेले पाहिले. त्यानंतर तिला शेजारील ओळखीच्या महिलेकडे नेले व तेथून पिडीतेच्या आईला फोन करून बोलाविले. त्यानंतर पिडीतेने सदरचा प्रकार आईला सांगितला आणि त्यानुसार खारघर पोलीस ठाणे येथे फिर्याद नोंद झाली आणि इसम नामे जान अन्वर आलम यावर गुन्हा दाखल झाला खारघर पोलीस ठाणे यांनी सदर गुन्हयाचा तपास पूर्ण करून दोषारोपपत्र मा. सत्र न्यायालयात दाखल केले. सदरच्या खटल्याची सुनावणी पनवेल येथील मा. अति सत्र न्यायाधीश २ माधुरी आनंद सौ. याच्या न्यायालयात झाली. या प्रकरणामध्ये पिडीत मुलगी तिची आई व भाउ, तसेच वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष महत्वाची ठरली.

सरकार पक्षातर्फे अति शासकीय अभियोक्ता, ॲड. प्रतिक्षा वडे-वारंगे यांनी न्यायालयासमोर केलेला युक्तिवाद आणि दाखल केलेले न्यायनिर्णय ग्राहय धरून न्यायालयाने आरोपी जान अन्वर आलम वय-२३ वर्षे यास भा. द. वि. कलम ३७६ (२) (आय) (जे), ३०७ तसेच पोक्सो कलम कायदा ३ ४ ५ ६ ७ ८ ९ १० अन्वये जन्मठेपेची व २२ हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा ठोठावली आहे. सदर दंडाची पुर्ण रक्कम पिडीत मुलीस देण्यास मा. न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. सदर खटल्याच्या निकालाकडे पनवेल आणि खारघर परिसरातील लोकांचे लक्ष लागून राहिलेले होते.

# काहिली जरा निवली...

उकळत्या लोहभट्टीजवळ दिवसभर उभ्या केलेल्या माणसाला तिथून हलवून उन्हात उभे केल्यावर त्याला जो दिलासा मिळेल, तशाच प्रकारचा दिलासा सर्वसामान्य माणसाला केंद्र व राज्य सरकारांनी पेट्रोल व डिझेलच्या अनुक्रमे उत्पादनशुल्कात व मूल्यवर्धित करात (व्हॅट) कपात केल्यामुळे मिळाला आहे. गेल्या दोन वर्षांत, त्यातही रशिया–युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून गेल्या तीन महिन्यांत जगभरात महागाईची होळी पेटली आहे. त्यात अमेरिकेसारख्या महासत्तेपासून ते जपान–युरोपपर्यंत सगळे जगच भाजून निघते आहे. नव्या महामंदीकडे ही वाटचाल सुरू आहे, अशी रास्त भीती जगभरातील अर्थतज्ज्ञ बोलून दाखवत आहेत. अशा परिस्थितीत भारतासारख्या इंधनासाठी परावलंबी असलेल्या देशाचे कंबरडे या भाववाढीने मोडले नसते तरच नवल! गेल्या तीन महिन्यांत किरकोळ व घाऊक महागाईच्या निर्देशांकांनी उच्चांक गाठले होते. एप्रिलमध्ये किरकोळ महागाई निर्देशांक ७.७९ टक्के, तर घाऊक महागाई निर्देशांक १५.०८ टक्क्यांवर पोचला होता. इंधनदरात होत असलेली वाढच या महागाईच्या मुळाशी आहे. इंधनाचे दर वाढले, की मालवाहतुकीपासून ते अन्नधान्यापर्यंत सगळ्यांची भाववाढ होते. एकदा महागाई वाढली, की मागणी कमी होते आणि त्यातून उत्पन्न घटते, असे हे दुष्टचक्र आहे. कच्च्या तेलावरचे आपले पराकोटीचे अवलंबित्व आणि तरीही आपल्या अर्थव्यवस्थेची गाडी सुरू राहण्यासाठी याच 'इंधना'ची असलेली तितकीच तीव्र आवश्यकता या चक्रव्यूहात आपण देश म्हणून पुरते फसले आहोत. त्यामुळे या परिस्थितीत आमूलाग्र बदल होत नाही, तोवरचे सगळेच उपाय हे तसे वरवरचे आणि तात्कालिक वाटतात. तरीही केंद्र सरकारने सर्वसामान्य माणसाचा अधिक अंत न पाहता, पेट्रोल व डिझेलवरचे उत्पादन शुल्क अनुक्रमे आठ व सहा रुपयांनी अशा विक्रमी रकमेने घटविले आणि त्यापाठोपाठ राज्य सरकारनेही यात फार राजकारण न आणता, आणखी करदिलासा दिला, हे महत्त्वाचे आहे. केंद्र सरकारने पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजनेतील नऊ कोटी लाभार्थ्यांना घरगुती स्वयंपाकाच्या एका सिलिंडरवर दोनशे रुपये अनुदान देण्याचा निर्णयही घेतला आहे. यामुळे वाढत्या महागाईला थोडा फार तरी आळा बसेल, अशी अपेक्षा आहे. या दरकपातीनंतरही महाराष्ट्रात तरी पेट्रोल लिटरला १०७ ते १०८ रुपयांच्या आसपास मिळणार आहे. वास्तविक शंभर रुपयांच्या पुढे हा दर गेला तेव्हाच त्याने महागाईची एक 'मानसिक पातळी' असते, ती पार केली होती. कितीही श्रीमंत माणूस असो वा गरीब; आपल्याला मिळणाऱ्या वस्तूंच्या भावाची एक 'वरची पातळी' त्याने मनात गृहीत धरलेली असते. पेट्रोल–डिझेलसाठी ही पातळी दोन आकडी रकमेचीच होती, असे मानायला हरकत नाही. किमती रोखून धरायच्या केंद्र सरकारच्या ताकदीचा अंदाज आणि सर्वसामान्यांच्या मनाचा राजकारण्यांना साधारणपणे असणारा अदमास या जोरावर सामान्य माणसाच्या मनात ही 'दोन आकडी' वरची पातळी निश्चित होत होती. मात्र, गेल्या दोन वर्षांत कोव्हिडकाळात सगळेच अर्थकारण उलटेपालटे झाले. ताज्या उत्पादनशुल्क कपातीमुळे केंद्र सरकारवर वार्षिक एक लाख कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडणार आहे, तर उज्ज्वला योजनेतील अनुदानापोटी वर्षाला ६१०० कोटी रुपयांचा अतिरिक्त भार येणार आहे. त्यामुळे केंद्र सरकार याची भरपाई करण्यासाठी कोणते उपाय आखणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. केंद्र सरकारच्या या करदिलाशानंतर राज्यांनीही आपापला वाटा उचलावा आणि सर्वसामान्यांना आणखी दिलासा द्यावा, अशी अपेक्षा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या करकपातीच्या घोषणेच्या वेळी केली. सीतारामन यांची अपेक्षा योग्य असली, तरी सध्याच्या केंद्र सरकारचे राज्यांशी, विशेषत: विरोधी पक्षांचे सरकार असलेल्या राज्यांशी असलेले आर्थिक वर्तन चोख नाही. जीएसटी हे याचे सर्वांना ठाऊक असलेले उदाहरण आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीही केंद्र सरकारच्या या निर्णयावर, ही करकपात अपेक्षेएवढी नसल्याची टीका केली असली, तरी दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी, राज्य सरकारनेही पेट्रोल व डिझेलवरचा मूल्यवर्धित कर (व्हॅट) अनुक्रमे २.०८ रुपये व १.४४ रुपयांनी कमी करून राज्यातील जनतेला दिलासा दिला. अर्थात, केंद्राने दोनदा उत्पादन शुल्क घटविल्यानंतर राज्याने दिलेला हा दिलासा आहे. महाराष्ट्रासारख्या देशातील एके काळच्या सर्वांत प्रगत आणि सर्वाधिक महसूल देणाऱ्या राज्यालाही आपल्या दैनंदिन गुजराणीसाठी इंधनावरील करातून येणाऱ्या उत्पन्नावरच अधिकांश अवलंबून राहावे लागते, हे केवळ राज्याच्या नेतृत्वाचे नव्हे, तर संघराज्यीय पद्धतीतून राज्यांना आर्थिक स्वातंत्र्य व स्वयंपूर्णता देणाऱ्या 'मॉडेल'पासून दूर जाण्याच्या केंद्राच्या धोरणांचेही अपयश आहे. तूर्त, पर्यायी इंधनावर शाश्वत उपाय मिळत नाही तोवर पेट्रोल–डिझेलच्या दरांचा हा 'सी–सॉ' हताशपणे बघण्यापलीकडे सामान्यांच्या हातात काही नाही. तोवर सध्याची दरकपात साजरी करू या!

# पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांनी घेतले शेलार मामांच्या समाधीचे दर्शन

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील उमरठ येथे प्रादेशिक पर्यटनमधून ५ कोटी रूपये मंजूर करून नरवीर तानाजी मालुसरे स्मारकाला ५ कोटी दिले त्यावेळीच सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कुडपणच्या पर्यटन विकासाचा आराखडा तयार करण्यापूर्वी रस्ता अन् संरक्षण भिंत उभारण्याकामी सोयी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या. शेलारमामांच्या समाधीपर्यंत जाण्याची वाट बिकट असली तरी शिवछत्रपतींच्या इतिहासाच्या काही महत्वाच्या व्यक्तींमध्ये वंदनीय असल्याने जाणे आवश्यक आहे, असे मत राज्याच्या पर्यटनराज्यमंत्री व रायगडच्या पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांनी व्यक्त केले.

पोलादपूर तालुक्यातील कुडपण या पर्यटनस्थळाची पाहणी करण्यासाठी पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांनी दौरा केला. शेलारांचे कुडपण येथे आयोजित बैठकीप्रसंगी गुरूवर्य अरविंदनाथ, तहसिलदार दिप्ती देसाई, रामदास कळंबे, महाड विधानसभा अध्यक्ष बाबू खानविलकर, जिल्हा सेवादल अध्यक्ष वाय.सी.जाधव, तालुका अध्यक्ष सुहास मोरे, माजी रायगड जिल्हा परिषद अध्यक्षा अपेक्षा कारेकर, तालुका महिला अध्यक्षा प्रतिभा पवार, शहर अध्यक्ष अजित खेडेकर, अमोल कारेकर, सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. कुडपणचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्यासंदर्भात ना.अदिती तटकरे यांना रामदास कळंबे यांनी कुडपणपर्यंतच्या धबधबा आणि भिमाची काठी तसेच जगबुडीनदीच्या विहंगम दृश्याची माहिती दिली. पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांनी कुडपण परिसरातील महावीर चक्रप्राप्त नाईक कृष्णा सोनावणे यांच्या स्मारकाला अभिवादन केले. यानंतर शेलारांच्या कुडपणमध्ये पायी चालत जाऊन शेलारमामांच्या समाधीचे आणि त्यावेळीच्या तलवार आदी शस्त्रांचे दर्शन घेतले.

कुडपण येथील बैठकीमध्ये बोलताना पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांनी, जलजीवन मिशनमधून कुडपण खुर्दला ४३ लाख ३०हजार आणि कुडपण बुद्रुक ४६ लाख ३८ हजार मंजूर या दोन्ही ठिकाणी पाणी योजना सुरू करण्यात येईल. कुडपणचा धबधबा, भिमाची काठी आणि अन्य पर्यटन विषयक विकासकामे तसेच माहिती फलक केल्यास पर्यटकांना आकर्षित केले जाईल, अशी माहिती देऊन शस्त्रांना काचेच्या पेट्यांमध्ये ठेवून संरक्षित करण्यासोबत शस्त्रांचीही माहिती दिल्यास पर्यटकांना शिवकालीन इतिहासाशी जवळीक होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.


कुडपण येथील शेलारमामांच्या समाधीच्या संरक्षणासाठी छप्परांसह इमारत तसेच अन्य सुविधांसाठी काही करता येईल, अथवा कसे, याबाबत पालकमंत्री ना.तटकरे यांनी विशेष मतप्रदर्शन केले. या दौऱ्यामध्ये पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांना देवपूर शिवमंदिर कोल्हापूर तंत्राचा बंधारा मंजूर करण्याकामी जगदीश महाडीक,महादेव शिंदे, प्रवीण महाडीक, संदेश शिनकर, मनोज महाडीक यांनी निवेदन दिले.



# मासे पकडण्यासाठी गेलेल्या पागोटे गावातील तरुणाचा बुडून दुर्दैवी मृत्यू

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील खोपटे खाडीजवळ पाच तरुण एंजॉय करण्यासाठी तसेच मासे पकडण्यासाठी गेले असता पार्टी संपल्या नंतर खोपटे खाडीतील छोट्या होडीने फिरण्याचा मोह झाला ते होडीत बसून ते मनसोक्तपणे फिरू लागले मात्र काही अंतरावर होडी गेल्यानंतर ती होडी लाटांच्या तडाख्यात सापडली व त्या होडीचा बॅलन्स बिघडला. समुद्राचे पाणी होडीत शिरू लागलं आणि अचानक ती होडी पलटी झाली. होडी मध्ये बसलेल्या पाचही मित्र पाण्यात पडले. ज्याचा तो आपलं जीव वाचण्यासाठी धडपड होता मात्र स्वप्निल चंद्रकांत पाटील, अविवाहित,वय वर्षे २८ राहणार पागोटे हा सुद्धा आपला जीव वाचवण्यासाठी प्रयत्न करत होता. परंतु पोहता पोहता त्याला दम लागला. तो आपल्या मित्रांना आवाज देत होता पण त्याचा आवाज मित्रांपर्यत पोचला नाही आणि क्षणार्धात स्वप्नीलचा त्या घटनास्थळी मृत्यू झाला.



विजय रामकृष्ण पाटील (पागोटे ), शुभम नरेश पाटील (पागोटे ), महेश जगनाथ म्हात्रे (खोपटे ), राकेश बाळाराम अहिरे (शिरवणे, नेरुळ, नवी मुंबई ), स्वप्नील चंद्रकांत पाटील( पागोटे )असे पाच मित्र खोपटे खाडी येथे एकत्र आले. ते एन्जॉय करण्यासाठी तसेच मासे पकडण्यासाठी एकत्र आले होते. बोटीच्या साहाय्याने खाडीत गेले असता बोट पल्टी झाली. यामध्ये पाच पैकी चार जण वाचले व एकाच दुर्दैवी मृत्यू झाला. उरण तालुक्यातील पागोटे गावातील स्वप्नील चंद्रकांत पाटील, अविवाहित,वय वर्षे २८ याचा या घटनेत दुर्दैवी मृत्यू झाला आहे. सदर घटना रविवार दिनांक २२/५/२०२२ रोजी दुपारी १:४५ वाजण्याच्या सुमारास घडली आहे.स्वप्नील पाटील यांच्या मृत्यूने पाटील परिवार, पागोटे गावातील ग्रामस्थांमध्ये दुःखकळा पसरली आहे.सदर घटनेची, मृत्यूची नोंद उरण पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिरुद्ध गिजे करीत आहेत.

# तळा तालुक्यात प्रथमच कष्टाळू शेतकरी सन्मान सोहळा

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील शेनाटे गावातील प्रतिष्टीत कष्टाळू शेतकरी पिताश्री गणपत धोंडू थिटेकर यांच्या वयाची ८५व्या वाढदिवसाचे औचित्य साधून शेती व्यवसायातून निवृत्ती घ्यावी व पुढील आयुष्य अतिशय सुखाचे उत्तम आरोग्यासाठी जावो. कष्टाळू शेतकरी निवृत्ती सोहळा हा स्तुत्य उपक्रम सर्व समाज बांधव शेनाटे ग्रामस्थ व मित्र परीवार यांच्या उपस्थितीत जगाचा पोशिंदा शेतकरी राजा हा कधीच सेवा निवृत्त होत नसतो परंतु शासकीय कर्मचाऱ्या प्रमाणे शेतकरी देखील निवृत्त व्हावा या संकल्पनेतून शेतकऱ्यांचा सन्मान व्हावा या उदात्त हेतूने मुलांनी कष्टाळू शेतकरी निवृत्ती सोहळ्याचे आयोजन १६ मे.२२ रोजी करण्यात आले होते.

या आनंददायी प्रसंगी कुलदैवताचे त्रिवार्षिक देवकार्य व शेनाटे गावातील २१ जेष्ठ शेतकऱ्यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. या प्रसंगी प्रा.सुनील देवरे यांनी कुलदैवत व शेतकरी या विषयावर समाज प्रबोधन पर मार्गदर्शन केले. तसेच माय स्टॅम्प योजने अंतर्गत कष्टाळू शेतकरी यांच्या स्टॅम्पचे अनावरण ऑल इंडिया पोस्टल कर्मचारी संघटना सचिव श्री. केशव मनवल यांच्या वतीने करण्यात आले.

या कार्यक्रमात सहकारी अमीश भौड, किरण नागावकर, स्वप्निल वंरडे किरण अडखळे मनोज वाढवळ दिपक शिगवण तळा तालुका कुणबी युवा संघ, यावेळी शिक्षक वर्ग, सामाजिक कार्यकर्ते, शेनाटे ग्रामस्थ–महिला नातेवाईक बहुसंख्येने उपस्थित होते. सुनियोजनबद्ध कार्यक्रम करून संपूर्ण समाजाला एक वेगळा आदर्श ठेवला आहे.असा तालुक्यातील पहिलाच सोहळा असल्याने थिटेकर परिवाराचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. व अभिनंदन केले जात आहे.

# सहजसेवा फाउंडेशनच्या वतीने खालापूर तहसील कार्यालय येथे पुस्तक लायब्ररीचा शुभारंभ

**दै.रायगड नगरी । खोपोली**

सहजसेवा फाउंडेशन समाजासाठी नाना विविध सातत्यपूर्ण उपक्रम राबवीत असते. समाजाची गरज ओळखुन सामाजीक उपक्रम करणे ही संस्थेची ओळख आहे.

खालापूर तालुक्यात तहसील कार्यालय येथे शासकीय कामासाठी समाजातील विविध स्तर येत असतात. कामानिमित्त काही वेळ थांबणाऱ्या नागरिकांचा वेळ वाचनात सार्थक ठरावा यासाठी सहजसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून तहसील कार्यालयातील आवारात विविध प्रकारची पुस्तके वाचण्यासाठी उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमाचा सोमवार दिनांक २३ मे २०२२ रोजी कर्जत खालापूर तालुक्याचे उपविभागीय अधिकारी अजित नैराळे यांच्या हस्ते व खालापूर तालुक्याचे तहसीलदार आयुब तांबोळी यांच्या मार्गदर्शनाखाली शुभारंभ करण्यात आला. यावेळी खालापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अनिल विभुते, खोपोली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शिरीष पवार, नायब तहसीलदार विजय पुजारी यांनी शुभारंभाचा श्रीफळ वाढविला. यावेळी तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहज–सेवा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.शेखर जांभळे, कार्याध्यक्षा माधुरी गुजराथी, उपाध्यक्षा इशिका शेलार, सचिव वर्षा मोरे, खजिनदार



संतोष गायकर, कार्यवाह बी.निरंजन, संघटक अखिलेश पाटील, महीला संघटक निलम पाटील, जनसंपर्क प्रमुख जयश्री कुलकर्णी, आयुब खान, मोहन केदार, आयान सय्यद यांनी अथक परिश्रम घेतले. दिवेश राठोड यांनी या उपक्रमाचे सूत्रसंचालन केले. उपविभागीय अधिकारी अजित नैराळे यांनी सहज लायब्ररीचा तहसील ऑफिस येथे येणाऱ्या जनतेसाठी नक्कीच उपयोग होइल तसेच जिल्हाधिकारी यांच्यामार्फत येणारे मासिक सुध्दा यात समाविष्ट होवून ज्ञानात नक्कीच भर पडेल असा आशावाद व्यक्त केला.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## थकबाकी अदा केल्यास राज्यातील अनेक विकासकामे मार्गी लागतील

खासदार विचारे यांनी केले. तर सरकार पाडण्यात अपयशी ठरल्याने बिनबुडाचे आरोप करण्याचा विरोधकांनी सपाटा लावला आहे. महाआघाडी, मुख्यमंत्र्यांवर टीका करण्यासाठी राणे आणि राणेपुत्रांनंतर आता राणा आले असल्याची टिकाही बबनदादा पाटील यांनी जाहीर सभेतून केली.

याप्रसंगी जिल्हा प्रमुख माजी आ. मनोहर भोईर यांनीही आमदार महेश बालदी यांच्यावर कडवट टीका करताना आगामी होऊ घातलेल्या निवडणुकांमध्ये भगवा फडकाविण्यासाठी शिवसैनिकांना कामाला लागण्याचे आवाहन केले. यावेळी शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख, जेएनपीटी कामगार ट्रस्टी दिनेश पाटील यांनी प्रास्ताविक करताना विकासकामांचा आढावा मांडला. तसेच यावेळी काही मुस्लिम बांधवांनी शिवसेनेत प्रवेश केला.

याप्रसंगी व्यासपीठावर उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, विधानसभा मतदारसंघ संपर्क प्रमुख महादेव घरत, तालुका प्रमुख संतोष ठाकूर जि.प.सदस्य विजय भोईर, पंचायत समितीचे माजी सभापती, पंचायत समितीचे सदस्य, महिला पदाधिकारी,सरपंच, सदस्य, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ओबीसी आरक्षणासंदर्भात ठाकरे महाविकास आघाडी सरकार अद्यापही निद्रास्थ

कार्यक्रमात बोलताना 'ओबीसींवर माझा फारसा विश्वास नाही, कारण जेव्हा मंडल आयोग आला तेव्हा मंडल आयोगाचे आरक्षण ओबीसींसाठी होते, पण जेव्हा लढायची वेळ आली तेव्हा ओबीसी लढायला मैदानात नव्हते, कारण ओबीसींना लढायचे नसते,' असे बेताल वक्तव्य केले होते. त्यामुळे महाविकास आघाडीमधील जबाबदार व्यक्ती स्वतःच्या स्वार्थासाठी ओबीसी समाजावर टीका करायलाही घाबरला नाही. त्यामुळे महाविकास आघाडी सरकार कुचकामी सरकार असल्याचे वारंवार स्पष्ट झाले असून ओबीसी समाजाचा आक्रोश ठाकरे सरकारला अद्यापही दिसत नसल्याने या आंदोलनातून महाविकास आघाडी सरकारला जागे करण्याचे काम करण्यात आले.

या आंदोलनात भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, महापौर डॉ. कविता चौतमोल, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, उपमहापौर सीता पाटील, सभागृहनेते परेश ठाकूर, माजी उपनगराध्यक्ष सुनिल घरत, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, प्रभाग समिती सभापती वृषाली वाघमारे, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, हरेश केणी, डॉ. अरुणकुमार भगत, विजय चिपळेकर, समीर ठाकूर, विकास घरत, राजू सोनी, शत्रुघ्न काकडे, प्रवीण पाटील, नगरसेविका चारुशीला घरत, सुशीला घरत, हेमलता म्हात्रे, राजेश्री वावेकर, अनिता पाटील, प्रमिला पाटील, संतोषी तुपे, पुष्पा कुत्तरवडे, मोनिका महानवर, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक गुरुनाथ गायकर, भाऊ भगत, माजी नगरसेविका नीता माळी, लीना पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, सरचिटणीस दशरथ म्हात्रे, भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, कळंबोली रविनाथ पाटील, ओबीसी शहर अध्यक्ष रामनाथ पाटील, आप्पा भागीत, युवा नेते समीर कदम, विद्या तामखेडे, रवींद्र गोवारी, प्रसाद म्हात्रे, सुरेश ठाकूर, प्रीतम म्हात्रे, नारायण पोपेटा,गोपीनाथ लोखंडे, डॉ. संतोष आगलावे, अनेश ढवळे, अमोल ठाकूर, हॅप्पी सिंग, अशोक आंबेकर, अभिषेक भोपी, प्रशांत फुलपगार, ॲड. मनोज म्हात्रे, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## पनवेल रेल्वे स्थानकात पिस्तूलाची विक्री करण्यासाठी आलेला गुन्हेगार गजाआड

या गुन्ह्यातील अटक आरोपी गोपाल राजपाल भारव्दाज हा उत्तरप्रदेश राज्यातील रा. नवोदय नगर, टेहरी विस्थापीत कॉलनी, साई मंदिर पार्कच्या जवळ राहणारा असून त्याला गुन्हे शाखा कक्ष २ ने शिताफीने ताब्यात घेतले आहे. सदरची कामगिरी गुन्हे शाखा कक्ष २ चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदिप गायकवाड, सपोनि फडतरे, पोउपनि, पाटील, पोउनि वैभव रोंगे यांच्यासह पथकाने केली आहे.

# ऐतिहासिक वास्तूंचे जतन करताना पुरातत्त्वीय शैली जपावी : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

श्री क्षेत्र जेजुरी गड तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील १०९.५७ कोटींच्या पहिल्या टप्प्याच्या कामास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. ऐतिहासिक वास्तूंचे जतन आणि संवर्धन करताना त्या वास्तूची मूळ शैली जपणे आवश्यक असून पुरातत्त्वीय जाण असलेल्या संस्थेमार्फत ही कामे करण्यात यावीत, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले. जेजुरी गडावरील मंदिराचे जतन आणि संवर्धन करताना परिसरातील इतर मंदिरेही पुरातत्व विभागाअंतर्गत संरक्षित करावीत, असेही त्यांनी सांगितले. पहिल्या टप्प्यात जेजुरी मंदीर व गड जतन आणि संवर्धन तसेच परिसर व जल व्यवस्थापनाचे काम करण्यात येणार आहे.

या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री अश–ोक चव्हाण, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, खासदार सुप्रिया सुळे, आमदार संजय जगताप, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी, पुणे जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद, पुरातत्व विभागाचे सहायक संचालक विलास वाहने, जेजुरी नगरपालिकेचे मुख्याधिकारी निखिल मोरे, आर्किटेक्ट तेजस्विनी आफळे आदी उपस्थित होते.

जेजुरी गड विकास आराखड्याअंतर्गत पहिल्या टप्प्यात वास्तूचे जतन आणि संवर्धन, पायाभूत सुविधा आणि पर्यटक सोयी सुविधा, जलव्यवस्थापन करण्यात येणार आहे. यामध्ये शास्त्रीय पद्धतीने दगडांची स्वच्छता, अनियोजित व हानिकारक जोडण्या काढणे, खराब झालेल्या चुन्याच्या गिलाव्याची डागडुजी, पाणी गळती थांबविण्यासाठी डागडुजी, विद्युत सोयी, पाणी पुरवठा, निचरा व्यवस्था, मल:निसारण आणि त्या पाण्याचा पुनर्वापर, योग्य वायुविजन प्रणाली, मंदिर परिसरातील धूळ गोळा करण्यासाठी यंत्र, घनकचरा व्यवस्थापन, भक्तांसाठी सोयीसुविधा, गर्दीचे व्यवस्थापन, आपत्कालीन व्यवस्थापन आणि पर्यावरणपूरक योजना आदी कामे करण्यात येणार आहेत.

श्री क्षेत्र जेजुरी गड तीर्थक्षेत्र मंदिराचे सपोर्ट क्षेत्रफळ १६७ चौरस मीटर असून कोटाचे क्षेत्रफळ १२४० चौ मी.आहे. येथे यात्रा उत्सवाच्या वेळी दर दिवशी सुमारे दीड ते दोन लाख तर वर्षात सुमारे ४० ते ५० लाख भाविक भेट देतात. या मंदिरास ऐतिहासिक समृद्ध वारसा असून अनेक राज्यातील नागरिकांचे हे कुलदैवत आहे. मागील २५० वर्षात याचे जतन आणि संवर्धन झाले नसल्याने ते अत्यावश्यक असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. देशमुख यांनी सादरीकरणाद्वारे दिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ऐतिहासिक वास्तूंवर झाडे उगवू नयेत, यासाठी उपाययोजना करून वास्तूंचे दगडांवर रंगरंगोटी न करता ते मूळ स्वरूपात ठेवावीत असे सांगितले. यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून नावीन्यपूर्ण योजनेअंतर्गत ही कामे करावीत अशी सूचनाही त्यांनी केली. तर, सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांनी पुरातत्व विभागाच्या अखत्यारीतील कामे या क्षेत्रातील तज्ज्ञांमार्फतच करावीत, अशी सूचना केली.

सन २०२१–२२ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात 'खंडेरायाची जेजुरी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र जेजुरी गड (ता. पुरंदर, जि. पुणे) या तीर्थक्षेत्राच्या विकासाकरीता निधी उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे शासनाकडून जाहीर करण्यात आले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडून रु.३४९.४५ कोटी रकमेचा श्री क्षेत्र जेजुरी गड तीर्थक्षेत्र विकास आराखडा एकूण तीन टप्प्यांमध्ये राबविण्याचे नियोजन तयार करण्यात आले आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## साईबाबा मंदिर वर्धापन दिन सोहळा साजरा



**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव तहसील कार्यालया जवळच असलेल्या आदर्शसमता नगर श्री साईबाबा मंदिराच्या ५ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन मंदिरात करण्यात आले होते. भाविकांनी साईबाबांचे दर्शन तसेच कार्यक्रमाचा लाभ घेतला.

आदर्शसमता नगर रहिवासी यांनी लोक वर्गणीतून या मंदिराचे निर्माण केले आहे. दरवर्षी वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला येथे अनेक भाविकांची गर्दी होत असते. यावर्षी सकाळी पहाटे काकड आरती, पुजा, होमहवन, साई भंडारा, पालखी, भजन असा भरगच्च दिवस भराचा कार्यक्रम होता. पायी पालखी साई मंदीर ते गजानन महाराज मंदीरा पर्यंत मृदंग आणि टाळ यांच्या ठेक्यावर साईनामाचा हरीनामाचा गजर करत नेण्यात आली. भजन संध्या व ऑर्केस्ट्रालाही अनेक लोक उपस्थित होते. साईबाबा मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त मंदिर परिसरात रोषणाई करण्यात आली होती. तसेच साई मंदिराची गाभाऱ्यातील सजावट लक्ष वेधून घेत होती. रविवारी दिवसभर हजारो भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री अदिती तटकरे, महाड माणगाव पोलादपूरचे आमदार भरत गोगावले, शिव–सेना नेते राजीव साबळे तसेच माणगाव शहराचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, उप नगराध्यक्ष सचिन बोंबले तसेच इतर नगरसेवक व मान्यवर यांनी देखील साई मंदिराला भेट देत साई चरणी नतमस्तक झाले.

## निसर्गप्रेमी प्राणी मित्रांनी केली प्राणी गणना


**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कोरोना कहर ओसरल्यानंतर दोन वर्षांनी मुरुड तालुक्यातील फणसाड अभयारण्यात बौद्ध पौर्णिमा दिवशी प्राणी गणना करण्यात आली असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी आर.बी.भोसले यांनी दिली.

वनसंपदेने नटलेल्या,पर्यटनात सुप्रसिद्ध असलेल्या चौपन्न कि.मी.क्षेत्र विस्तार असलेल्या फणसाड वन्यजीव अभयारण्यात बौद्ध पौर्णिमेचे औचित्य साधून सोमवार दि.१६ मे ते मंगळवार दि.१७ मे २०२२ रोजी उपवनसंरक्षक व वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्राणी गणना करण्यात आली. यामध्ये अभयारण्यातील काशिद, सुडकोली व नांदगाव या तीन परिमंडळातील तेरा मचाण, वनअधिकारी, कर्मचारी, ग्रीन वर्क्स ट्रस्ट, आऊल फाऊंडेशन, मानद वन्यजीव रक्षक (रायगड) व निसर्ग प्रेमी यांनी सहभागी होऊन उत्तम प्रकारे वन्यप्राणी पक्षी प्रगणनेचे काम केले. पर्यटनात फणसाड अभयारण्य पर्यटकांचे खास आकर्षण ठरले असून नैसर्गिक वनसंपदा व विविध प्रकारचे पशु–पक्षी–प्राणी याठिकाणी आढळतात. याक्षेत्रात २७ पाणवठे असून वन्यजीवांची प्रगणना करण्यासाठी तेरा मचाण होते. यामध्ये निसर्ग प्रेमीसंस्था देखील सहभागी झाल्या होत्या. रात्रभर जागता पाहारा देत ही प्रगणना करण्यात आली. यावेळी फणसाड अभयारण्यात रानडुक्कर, भेकर,ससा, रानमांजर, रानगवा, शेकरु, माकड, वानर, सांबर, खवल्या मांजर या प्राण्यांसह मोर, घार, फ्रांग माऊथ, वटवाघूळ, आर्न बिल, रातवा, भारद्वाज, कोतवाल इ.पक्षीआणि प्राणी गणनेसाठी नोंदी घेत असताना बिबट्याच्या पाऊल खुणा आणि ओरखडे यांच्या नोंदी घेण्यात आल्या.

# ऐतिहासिक व महत्वपूर्ण पर्यटन स्थळे पर्यटकांच्या प्रतीक्षेत

## इतिहासप्रेमी, दुर्गप्रेमीं व पर्यटकांनी असंख्य पर्यटनस्थळांकडे फिरवली पाठ





**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

गडकिल्ले, ऐतिहासिक वास्तू, देवालये, तब्बल २४० किमीचा सुंदर व रमणीय समुद्रकीनारा आणि निसर्गसौंदर्याने नटलेल्या रायगड जिल्ह्यात सध्या पर्यटकांची रेलचेल आहे. परंतु रायगड, मुरुड–जंजिरा किल्ला, अलिबाग, हरिहरेश्वर, दिवे–आगर, मुरुड–काशीद असे समुद्र किनारे, महड व पालीचा गणपती अशी काही ठराविक ऐतिहासिक धार्मिक व पर्यटन स्थळे सोडल्यास जिल्ह्यातील इतर दुर्लक्षित पण महत्वाच्या पर्यटन स्थळांकडे पर्यटक पाठ फिरवितांना दिसत आहेत.

येथे शिवरायांच्या काळातील अनेक गड–किल्ले आहेत. ज्याचा विसर इतिहास व दुर्गप्रेमींना झाला आहे. त्यामध्ये अलिबाग जवळील भव्य जलदुर्ग खांदेरी–उंदेरी, चौलचा किल्ला, मुरुड जवळील कोर्लई किल्ला, रायगडावर निजामपुर मार्गे जातांना लागणारे माणगाव तालुक्यातील माणगड व कुर्डूगड (विश्रामगड) पालीजवळ असलेले मृगगड, सरसगड तसेच सुधागड हे भव्य किल्ले. शिवरायांच्या पराक्रमाने पावन झालेली उंबरखिंड, तळा तालुक्यातील तळगड किल्ला त्याच्या समोरच दिसणारा घोसाळगड किल्ला. पाचाड येथे असलेली जिजाबाईंची समाधी या सर्व ऐतिहासिक महत्व असलेल्या वास्तू उपेक्षित आहेत.

जिल्ह्याला २४० कि.मी. लांबीचा विस्तृत समुद्र किनारा लाभला आहे. परंतू अलिबाग, नागाव, मुरुड, काशीद, हरिहरेश्वर असे काही ठराविक समुद्र किनारे सोडल्यास अनेक चांगल्या किनारी पर्यटक फिरकत नाहीत. त्यामध्ये श्रीवर्धन तालुक्यातील आदगाव, शेखाडी, बागमांडला, दिघी येथील मनोहारी समुद्र किनारे तसेच अलिबाग व मुरुड मधील अनेक समुद्रकिनारे ओस असतात. काही ठराविक समुद्र किनारे सोडल्यास अनेक चांगल्या किनारी पर्यटक फिरकत नाहीत.


खालापुर तालुक्यातील पाली–खोपोली मार्गावर शेमडी गावापासुन अवघ्या चार किमी वर असलेली उंबरखिंड जेथे शिवरायांनी अवघ्या एक हजार सैनाला घेवुन तब्बल २० हजार सैन्यासह स्वराज्यावर चाल करुन आलेल्या कारतलबखान चा पाडाव केला होता. शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष देणारा विजयस्तंभ तेथे उभारण्यात आला आहे. निसर्ग सौंदर्याने नटलेले हे ठिकाण खुपच आकर्षक आहे. पुण्या–मुंबईच्या पर्यटकांना येथे सहज येता येऊ शकते. परंतू येथे ठराविकच लोक भेट देतात. नरवीर तानाजी मालुसरे यांचे जन्मगाव पोलादपूर तालुक्यातील उमरठ हे गाव. तेथे तानाजी व मराठ्यांचा शूर सरदार शे–लार मामांची समाधी आहे. तसेच तानाजींचा भव्य पुतळा देखिल आहे. परंतू ते पाहण्यासाठी फारसे लोक तेथे फिरकत नाहीत. पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांचे जन्मस्थळ असलेल्या श्रीवर्धन तालुक्यात शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी त्यांच्या घरातील चौथर्यावर पेशवे स्मारक/मंदिर उभारण्यात आले आहे. परंतु तेथेही कोणी फारसे जात नाही. अशी अनेक स्मारके दुर्लक्षित आहेत.



महाडकडे जातांना महामार्गाच्या कडेलाच गांधारपाले गावाजवळ डोंगरात कोरलेल्या २९ भव्य बौद्ध लेण्या आहेत. रायडावर जाणारे पर्यटक फक्त रस्त्यावरुनच या लेण्या पाहतात व पुढे मार्गस्थ होतात. तसेच माणगाव तालुक्यातीत मांदाड खाडी मुखाजवळ डोंगरात कोरलेल्या वीस बौद्ध लेणी आहेत. तळा येथील कुडा लेणी, सुधागड तालुक्यातील नेणवली येथील एकविस लेणी, ठाणाळे जवळ प्राचीन लेणी समूह, तर गोमाशी गावजवळ प्राचीन भृगू ऋषींचे (बौद्ध) लेणे आहे. अशा अनेक प्राचीन लेण्यांची दुरवस्था झाली आहे.

पनवेल कर्नाळा रस्त्यावर असलेले शिरढोण हे आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचे जन्मगाव तेथे त्यांचा वाडा आहे. तेथे त्यांच्या व कुटूंबाच्या वस्तु जतन करण्यात आल्या आहेत. कर्नाळा किल्ल्यावर अनेक लोक जातात परंतू क्रांतिविरांच्या वाड्यावर फारसे कोणी जात नाही. भुदान चळवळीचे प्रणेते व पहिले वैयक्तिक सत्याग्रही असलेले विनोबा भावे यांचे पेण तालुक्यातील गागोदे हे जन्मगाव तेथे त्यांचा वाडा आहे. क्वचित शाळेतील मुलांच्या ठराविक सहलींशिवाय येथे कोणीही जात नाही. तसेच महाड तालुक्यात नाते गावात देशाचे पहिले अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख यांचे घर दुर्लक्षित आहे. तसेच माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री बॅ.ए. आर अंतूले यांचे आंबेत गाव, रोह्यातील स्वाध्याय परिवाराचे अध्वर्यू पांडूरंगशास्त्री आठवले यांचे जन्मगाव पाहण्यासारखे आहे.

महाड पोलादपुर रस्त्यावरुन शिवथरघळी कडे जाणारा फाटा आहे. महाडवरुन येथे जाण्यास बससेवा उपलब्ध आहे. शांत, निरव व रमणीय या घळीत समर्थांनी दहा वर्षे वास्तव केले होते. यथेच त्यांनी दासबोधाची निर्मीती केली. या मठास सुंदरमठ म्हणतात. धुळ्याचे श्री शंकर श्रीकृष्ण देव यांनी १९३० मध्ये या घळीचा शोध लावला. डोंगरदर्यांत व दुर्गम भागात असल्याने या ठिकाणी फारसे कोणी येत नाही. पालीपासून अवघ्या तीन कीमीवर असलेल्या उन्हेरे येथील तसेच महाड तालुक्यातील सव येथील गरम पाण्याच्या झर्यांकडे पर्यटक फारसे पर्यटक फिरकतांना दिसत नाही. स्थानिक लोक उन्हाळ्यात देखील इथे स्नान करतात. मात्र या निसर्गाच्या अद्भुत ठेव्याची माहिती किंवा आंनद घेण्यासाठी फारसे पर्यटक येत नाही. भारताला भेट देणारा पहिला रशियन प्रवासी अफनासी निकितीने इ.स. १४७२ च्या सुमारास चौल रेवदंडा बंदरात प्रवेश केला. रेवदंडा येथे त्याचे स्मारक उभारण्यात आले आहे. तर चौल हे प्राचीन ऐतिहासीक शहर व शिलाहार राजाची राजधानी होते. अनेक प्राचीन मंदिरेही आहेत. तसेच मोगल, पोर्तुगीज व मराठेकालीन राजवटींचे अनेक अवशेष आढळतात. शोकांतिका म्हणजे समुद्र किनार्याचा आस्वाद घेण्यासाठी अलिबाग व मरुडकडे येणारे पर्यटक या गावांवरुन जाऊन देखिल तेथे फारसे थांबत नाहीत. श्रीवर्धन तालुक्यातील श्री रूपनारायण मंदिर, सिद्धिविनायकाचे प्राचिन मंदिर, काळभैरव, सोमजाई, कुसमादेवी ही जागृत मंदिरे. माण–गाव मुगवली स्वयंभू गणेश मंदिर, अलिबाग तालुक्यातील कणकेश्वर येथील शिवमंदिर आदी अनेक तालुक्यांतील प्राचीन मंदिरे व धर्मस्थळे उपेक्षित आहेत.





## चोरीचा छडा लावणाऱ्या पोलिसांचा सन्मान


**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर मधील इस्कॉन मंदिरातील दानपेट्या फोडून त्य रोख रक्कम चोरणाऱ्या दोघा बांग्लादेशी सराईत गुन्हेगारांना पकडणा मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेतील पथकाचा इस्कॉन मंदिर व्यवस्थापनाने प्रमाणपत्र देऊन सन्मान केला आहे.

खारघर मध्ये उभारण्यात येत असलेल्या इस्कॉन मंदिराच्या संरक्षक भिंतीवरुन उडी टाकून आरोपी राजू शेख आणि आकाश खान या दोन बांग्लादेशी नागरिकांनी ३१ जानेवारी रोजी रात्रीच्या सुमारास प्रवेश केला होता. त्यानंतर या दोघांनी मंदिरातील तीन दानपेट्या फोडून त्यातील रोख रक्कम चोरुन नेली होती. त्यानंतर गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाने सदर गुन्ह्याचा तपास करीत इस्कॉन मंदिर परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. यानंतर आरोपींची माहिती मिळवून पोलिसांनी दोघा आरोपींना ओवे गाव कॅम्प येथून अटक केली होती.

गुन्हे शाखेतील मध्यवर्ती कक्षाने केलेल्या सदर कामगिरीची इस्कॉन मंदिर व्यवस्थापनाने दखल घेतली आहे. तसेच सद–रचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी विशेष प्रयत्न करणारे गुन्हे शाखेचे पोलीस उपआयुक्त सुरेश मेंगडे, सहाय्यक पोलीस आयुक्त विनायक वस्त तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयसिंह भोसले, सहाय्यक पोलीस निरीक्षक गंगाधर देवडे, हेड कॉन्स्टेबल मंगेश वाट, पोलीस नाईक, किरण राऊत, विजय खरटमोल, राहुल वाघ, लक्ष्मण कोपरकर, नितीन जगताप, प्रकाश साळुंखे या सर्वांचा इस्कॉन मंदिराचे अध्यक्ष तथा ट्रस्टी डॉ. सुरदास यांनी प्रमाणपत्र देऊन सन्मान केला आहे.

## केवनाळे दरडग्रस्तांच्या पुनर्वसनकामी भुसंपादनाचा मोबदला ; आ.भरत गोगावले यांच्या हस्ते जमीनदात्यांना धनादेश वाटप



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील देवळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील केवनाळे आणि साखर सुतारवाडी येथील २०२१ मधील दरडग्रस्त गावांच्या पुनर्वसनासाठी भुसंपादन करण्यात आलेल्या जमीनदात्यांना सोमवारी पोलादपूर तहसिल कार्यालयामध्ये आ.भरत गोगावले यांच्याहस्ते धनादेश प्रदान करण्यात आले. यावेळी महाडच्या उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड, पोलादपूरच्या तहसिलदार दिप्ती देसाई, राजिपचे सदस्य चंद्रकांत कळंबे तसेच निवासी नायब तहसिलदार समीर देसाई व अन्य उपस्थित होते.

प्रारंभी प्रांताधिकारी प्रतिमा पुदल–वाड यांनी, साखर आणि केवनाळे टाटा आणि कोटक महिंद्रा ग्रुपच्या माध्यमातून पुनर्वसन घरकुलांची बांधकामं सुरू होणार असून याकामी आवश्यक जमिनींच्या भुसंपादनाचे प्रस्ताव शासनाकडून मंजूर झाल्यानंतर संबंधित जमीनदात्यांना त्यांच्या जमिनींच्या भुसंपादनाचा मोबदला देण्याचे निश्चित झाले आहे. लवकरच या पुनर्वसनाच्या कामाची सुरूवात होणार असल्याचे यावेळी प्रांताधिकारी पुदलवाड यांनी सांगितले.

याप्रसंगी आ.गोगावले यांनी, दरडग्रस्तांच्या पुनर्वसनाकामी महाआघाडी सरकारच्या माध्यमातून टाटा आणि कोटक महिंद्रा ग्रुपच्या माध्यमातून पुनर्वसन घरकुलांची बांधकामं सुरू करण्याकामी शासनाकडे भुसंपादन करण्याकामी ज्या जमिनीधारक शेतकऱ्यांनी जमिनी देण्यासाठी आमच्या विनंतीला मान देऊन सहकार्य केले. त्या सर्वांना शासनातर्फे मोबदल्याचे धनादेश देण्यात येणार असून या पुनर्वसन घरकुलांच्या कामांपुर्वी अन्य रस्ते, शाळा, मंदिर, सभागृह आणि अंगणवाड्यांसारखी कामेही सुरू होणार असल्याने दरडग्रस्तांना नक्कीच दिलासा देण्यात येईल, असे मत मांडले.

याप्रसंगी हरी राघू केसरकर, बाळकृष्ण विठोबा उतेकर, शंकर राघू केसरकर, लक्ष्मण राघू केसरकर,तुळाजी शंकर केसरकर आदी शेतकऱ्यांना महाड उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड आणि महाडचे आमदार भरत गोगावले यांच्याहस्ते भूसंपादनाच्या मोबदल्याचे धनादेश देण्यात आले.

---

राव साहेब

**अर्जदारातर्फे वकील**
**विवेक सदाशिव तावडे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.६२७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०७/२०२२

**१) श्रीमती.संगीता प्रशांत मोरे**
वय : ५२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२३४३, तळमजला, २०० सी.जी.एस.क्वाटर्स,
रवोजी गणात्रा रोड, सेक्टर ६,
अँटॉप हिल, मुंबई–४०००३७
**२) अश्विनी कबीर गायकवाड**
वय : २७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
प्लॉट ६०/३७, नवरत्न सी.एच.एस.,
गोराई–१, बोरीवली (प) मुंबई–४०००९१ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कै. नीरज प्रशांत मोरे यांचे निधन दि.०५/१०/२०२० रोजी आरोग्य उपकेंद्र खिंगर, तालुका : महाबळेश्वर, जिल्हा : सातारा येथे झाले आणि अर्जदार १) श्रीमती.संगीता प्रशांत मोरे, वय : ५२, व्यवसाय : गृहिणी, रा.२३४३, तळमजला, २०० सी.जी.एस. क्वाटर्स, रवोजी गणात्रा रोड, सेक्टर ६ अँटॉप हिल, मुंबई–४०००३७ २) अश्विनी कबीर गायकवाड, वय : २७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी, रा.प्लॉट ६०/३७, नवरत्न सी.एच.एस., गोराई–१, बोरीवली (प), मुंबई–४०००९१ यांनी या कोर्टात सदर मयत नीरज प्रशांत मोरे यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळवण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील (स्थावर मिळकती) (अविभक्त ५० टक्के हिस्सा) दुकान नं.१६, तळमजला, सत्य संस्कार को.ऑ.हौ.सो.लि., प्लॉट–३०, सेक्टर–१ ई, कळंबोली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड. (क्षेत्रफळ : १२.८२ चौरस मीटर बिल्टअप)**

कै.नीरज प्रशांत मोरे यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणाच्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२३/०५/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मे.पांडे साहेब यांच्या कोर्टात

**अॅड.प्रियांका कुडावकर**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्रं.५९५/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२७/०६/२०२२

**श्री.ज्ञानेश्वर चिंतामण म्हात्रे**
वय : ६६, व्यवसाय : शेती
रा.मु.पो.कातकरवाडी जवळ, कुंडेवहाळ,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र–४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
**ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी /**
**निबंधक जन्म मृत्यू नोंदणी विभाग**
ग्रुप ग्रामपंचायत गव्हाण, ता.पनवेल,
जि.रायगड, पिन कोड–४१०२०६ सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवासी असून अर्जदार यांनी त्यांचे **आजोबा कै.धोंडू कावळ्या म्हात्रे** हे अर्जदार यांचे आजोबा असून **कै.धोंडू कावळ्या म्हात्रे** हे मौजे : बेलपाडा, पोस्ट : जासई, ता.पनवेल, जि.रायगड येथील कायमचे रहिवासी होते व **कै.धोंडू कावळ्या म्हात्रे** ह्यांचा मृत्यू दि.१०/०१/१९२६ रोजी मौजे : बेलपाडा, पोस्ट : जासई, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे व त्याबाबत अर्जदार यांनी मृत्यूचा दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज केला आहे.

अर्जदारांचे मागणीप्रमाणे **कै.धोंडू कावळ्या म्हात्रे** यांच्या मृत्यूचा दाखला अर्जदार यांना देणेबाबत कोणाचीही कोणतीही हरकत असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दि.२७/०६/२०२२ रोजी पर्यंतचे आत लेखी / तोंडी हरकत दाखल करावी.

वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या आजोबांचा मृत्यू दाखला देणेबाबत योग्य ते आदेश करण्यात येतील याची दखल घ्यावी.

आज दि.२३/०५/२०२२ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**

---

मा.इंदलकर साो.कोर्ट

**अर्जदारातर्फे वकील**
**अॅड.गुरुनाथ दत्ता भगत**
**अॅड.शेष डी. देशपांडे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी साो. वर्ग १ यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्रं.४४१/२०२२
नि.नं.७
ने.ता.२२/०६/२०२२

**श्री.मयुरेश किसन कोंडीलकर**
वय : २७, धंदा : शिक्षण
रा.अल्टा स्टाफ कॉलनी, रुम नं.१, मुळगाव,
पो.शिळफाटा, ता.खालापूर, जि.रायगड,
पिन नं.४१०२०३, मो.नं.९७६३१७७६८० अर्जदार
विरुद्ध
**निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी**
ग्रुप ग्रामपंचायत जांभिवली,
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी त्यांच्या आजीचा **मयत कमलाबाई हिरु कोंडीलकर** यांचा मृत्यू दि.०७/०१/२०२१ रोजी जांभिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. तशी मृत्यूची नोंद होवून मिळण्यासाठी फौजदारी चौकशी अर्ज क्र.४४१/२०२२ दाखल केला असून सदरच्या नोंदीबाबत कोणासही कसल्याही प्रकारची हरकत घ्यावयाची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत घ्यावी. कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास कोणासही काही बोलायचे नसून असे समजून मा.कोर्ट अर्जदारांचे लाभात योग्य तो आदेश देईल याची नोंद घ्यावी.

स्थळ : पनवेल
दिनांक : २३/०५/२०२२

**सही/–**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**

---

मा.इंदलकर साो.कोर्ट

**अर्जदारातर्फे वकील**
**अॅड.गुरुनाथ दत्ता भगत**
**अॅड.शेष डी. देशपांडे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी साो. वर्ग १ यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्रं.४३८/२०२२
नि.नं.७
ने.ता.२४/०६/२०२२

**श्रीमती.भीमा तुकाराम कोंडीलकर**
वय : ५४, धंदा : शेती
रा.घर नं.५७, जांभिवली, पो.आपटा,
ता.पनवेल, जि.रायगड पिन नं.४१०२०७
मो.नं.९७६३१७७६८० अर्जदार
विरुद्ध
**निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी**
ग्रुप ग्रामपंचायत जांभिवली,
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी त्यांच्या पतीचा **मयत तुकाराम झिपरु कोंडीलकर** यांचा मृत्यू दि.१४/०१/२००१ रोजी जांभिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. तशी मृत्यूची नोंद होवून मिळण्यासाठी फौजदारी चौकशी अर्ज क्र.४३८/२०२२ दाखल केला असून सदरच्या नोंदीबाबत कोणासही कसल्याही प्रकारची हरकत घ्यावयाची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत घ्यावी. कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास कोणासही काही बोलायचे नसून असे समजून मा.कोर्ट अर्जदारांचे लाभात योग्य तो आदेश देईल याची नोंद घ्यावी.

स्थळ : पनवेल
दिनांक : २३/०५/२०२२

**सही/–**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**

# मोरा-भाऊचा धक्का सागरी प्रवास २६ मे पासून महागणार

**दै.रायगड नगरी । उरण**

मोरा- भाऊचा धक्का या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक तिकिट दरात २६ मे २०२२ पासून पावसाळी हंगामासाठी १५ रुपयांची वाढ करण्यात येणार आहे. पावसाळी हंगामासाठी दरवाढ होणार असल्याने सागरी प्रवास ९० रुपयांवरुन १०५ रुपयांपर्यंत महागणार आहे. दरवर्षी पावसाळी हंगामात मोरा- भाऊचा धक्का या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक तिकिट दरात भरमसाठ वाढ केली जाते.मागील वर्षीही पावसाळी हंगामासाठी तिकिट दरात ७५ रुपयांवरुन ९० रुपयांपर्यंत अशी १५ रुपयांची वाढ करण्यात आली होती.

यावर्षीही मुंबई जलवाहतूक औद्योगिक सहकारी संस्थेने पावसाळी हंगामासाठी तिकिट दरात ९० रुपयांवरुन थेट १०५ रुपयांपर्यंत वाढ



करण्यात येणार आहे.हाफ तिकिट दरातही वाढ करण्यात येणार आहे.ही पावसाळी हंगामासाठी तिकीट दरवाढ २६ मेपासूनच लागु करण्यात येणार असली तरी तिकिट दरवाढीची मंजुरी मेरिटाईम बोर्डाकडून २०21 मध्येच घेण्यात आली असल्याची माहिती मोरा बंदर निरिक्षक प्रभाकर पवार यांनी दिली आहे.

दरवर्षी मोरा- भाऊचा धक्का या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक तिकिट दरात कधी इंधन वाढीचे तर कधी पावसाळी हंगामाचे कारण पुढे करत १५ ते २० रुपयांपर्यंत वाढ केली जाते.त्यानंतर करण्यात आलेली तिकीट दरवाढ उन्हाळी हंगामातही कायम ठेवली जाते.त्यानंतर पावसाळी हंगामात पुन्हा तिकिट दरवाढ केली जाते.या तिकीट दरवाढीवर कुणाचाही अंकुश राहिलेला नाही.त्यामुळे २०२३ सालच्या पावसाळी हंगामात तिकीट दरवाढ १२० ते १२५ रुपयांपर्यंत पोहचल्यास आश्चर्य वाटणार नसल्याच्या संतप्त प्रतिक्रिया प्रवाशांकडून व्यक्त केल्या जात आहेत.

मोरा-भाऊचा धक्का हा सागरी मार्ग प्रवासी वाहतुकीसाठी अत्यंत फायदेशीर, सुखद आणि शार्टकट म्हणून ओळखला जातो.वाहतुक कोंडीची दगदग नसल्याने या सागरी मार्गावरुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे.त्याशिवाय दरवर्षी पावसाळी हंगामात गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा-अलिबाग , भाऊचा धक्का ते रेवस या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूकही बंद ठेवण्यात येते. त्यामुळे मांडवा-अलिबागकडे जाणाऱ्या प्रवाशांची मोरा- भाऊचा धक्का या सागरी मार्गावर गर्दी वाढते. मात्र दरवर्षी हंगाम पावसाळी असो उन्हाळी तिकिट दरवाढ प्रवाशांच्या पाचवीलाच पुजलेली आहे.मात्र तिकिट दरवाढीनंतरही प्रवाशांच्या सुविधांमध्ये कोणत्याही प्रकारची वाढ होत नाही.उलट प्रवाशांच्या नशिबात गळक्या प्रवासी बोटी आणि समस्यांचाच अधिक सामना करावा लागत असल्याच्या संतप्त प्रतिक्रिया प्रवाशांकडून व्यक्त केल्या जात आहेत.

# संक्षिप्त...

## ४४ वर्षे महिला बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बंदर रोड, पनवेल येथून कोणाला काहीही न सांगता ४४ वर्षीय फरजाना अब्दुलरजाक हातोडकर ही महिला घरातून निघून गेली आहे. त्यामुळे ती हरवली असल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

या महिलेचा रंग सावळा, अंगाने मध्यम आहे. तिची उंची पाच फूट, दोन इंच असून अंगात नारंगी रंगाचे सल-वार, ब्राऊन रंगाचा लेंगा व ओढणी घातलेली आहे. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस नाईक यु बी पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

## ७० ते ७५ वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह सापडला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जेएनपीटी ते पळस्पे मार्गाच्या मधील एका नाल्यामध्ये ७० ते ७५ वर्षीय इसमाचा मृतदेह पनवेल शहर पोलिसांना सापडून आला आहे. त्याच्या नातेवाईकांचा पनवेल शहर पोलीस शोध घेत आहेत. त्याचा वर्ण गोरा, उंची पाच फूट, तीन इंच, नाक सरळ, चेहरा उभट आहे. त्याचे डोळे कुजलेले, सफेद दाढी, अंगात फूल बाह्यांचा शर्ट व थ्री-फोर्थ पँट परिधान केलेली आहे. या ईसमाबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस उपनिरीक्षक ए. राजुरे यांच्याशी संपर्क साधावा.

## आरोग्य मेळाव्यात ५०० हुन अधिक नागरिकांनी घेतला लाभ

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

आरोग्य संपदा हीच खरी संपदा असल्याचे जाणून जनतेच्या निरोगी व सदृढ आरोग्यासाठी आरोग्य शिबीर महत्वाची भूमिका बजावतात. सुधागड तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वाघोशीच्या वतीने व पालकमंत्री अदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांच्या नेतृत्वाखाली तसेच पाली नगरपंचायत नगराध्यक्षा गीता पालरेचा यांच्या विद्यमाने वाघोशी येथे नुकतेच मोफत भव्य आरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या आरोग्य मेळाव्यात वाघोशी पंचक्रोशीतील तब्बल ५०० हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला. या आरोग्य मेळाव्यास पाली नगराध्यक्षा गीता पालरेचा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सुरुवात करण्यात आली. अजूनही काही ग्रामीण भागातील नागरिक रोगाची, आजाराची लागण होऊनही त्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे रोग व आजार अधिक बळावतो. म्हणून वेळेवर उपचार होऊन वाघोशी पंचक्रोशीतील नागरिक सदैव सुदृढ निरोगी रहावेत या उद्देशाने हे शिबीर भरविले गेले. यावेळी स्त्रीरोग तज्ञ, बालरोग तज्ञ, जनरल सर्जन, कान, नाक व घसा तज्ञ, नेत्र रोग चिकित्सक, भिषक, त्वचा रोग तज्ञांनी नागरीकांची आरोग्य तपासणी केली.


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# पेण ग्रामीण भागात पावसाळापूर्वी शेती मशागतीला वेग

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील शेतकऱ्यांनी रखरखत्या उन्हात शेतीची कामे सुरू करण्यास सुरुवात केली आहे. अवघ्या पहिल्या दुसऱ्या आठवड्याभरात पेरणी करावी लागणार असल्याने तालुक्यातील ग्रामीण भागात शेती मशागतीला वेग आलेला दिसत आहे.

मागील तीन वर्षापासून सतत चक्री वादळ, तोक्ते वादळी वाऱ्यासह, कोरोना, नैसर्गिक आपत्तीमुळे पेण तालुक्यातील शेतकरी राजा होरपळून निघाला होता. यावर्षी शेतकरी राजा एका नव्या उमेदीने शेती कामात व्यस्त झाला आहे. तसेच यावर्षी हवामान खात्याने यावेळेस लवकर पाऊस सांगितल्याने शेतकरी पुन्हा खरीपाच्या पेरणीचे नियोजन करीत असल्याचे दिसून येत आहे. दिवसेंदिवस हवामान बदलत असल्याने कधी ढगाळ वातावरण तर कधी पाऊस तर कडाक्याच्या ऊन पडत आहे. त्यामुळे उन्हाचा पारा वाढला असला तरी बळीराजा नांगरणी, वखरणी, काटेरी झुडपे तोडून, बांध दुरुस्ती, आधी कामात मग्न झाला आहे. पेण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतीला जोडधंदा तसेच बहुतांश ठिकाणी पुरेसा सिंचन व्यवस्था नसल्याने येथील शेतकऱ्यांना खरीप हंगामावर जास्त प्रमाणात अवलंबून राहावे लागते. त्यातच गेल्या अडीच वर्षांपासून कोरोनाच्या प्रकोपात शासनाकडून लावण्यात आलेल्या लॉकडाऊन व कडक निर्बंध यामुळे शेतकरी राजा मेटाकुटीला आला होता. तरी सुद्धा तालुक्यातील शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा जुगार खेळण्या करता कंबर कसली आहे.

त्यामुळे त्यांनी शेती मशागतीच्या कामांना वेग दिला आहे. शेतकरी मशागतीच्या कामाला लागला असतानाच रासायनिक खताच्या किमती गगनाला भिडल्याचे दिसून येत आहे. मात्र त्या तुलनेत शासनाने शेत मालाचे हमी भाव वाढवला नाही. शेती साहित्य, बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशाकासह शेतात काम करणाऱ्या मजुरांचे सुद्धा दर वाढल्याने उत्पादन खर्चाच्या तुलनेत हमीभाव नगण्यच मिळत आहे.

मागील दोन वर्षांच्या लॉकडाऊन काळात सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले हो-ते, तसेच आर्थिक नियोजन बिघडले होते. तर शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला असल्याने आर्थिक विवंचनेत सापडला होता. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांकडे सध्या पीक असले तरी खर्चासाठी नगदी रकमेची उणीव जाणवतं होती. तसेच शेती कामातसुद्धा कामे करण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या होत्या. यावर्षी कोरोनाने स्थिती नियंत्रणात येऊन बंधने नसल्याने शेतकरी पावसाळपूर्वी शेतीची मशागतीची काम व्यस्त झाला आहे.

# महिंद्रा पिकअप गाडीची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील रॉयल सर्व्हिसेस डीत्सुबिटर , गोपिका हॉटेलच्या बाजूला तालुक्यातील कोन गावामध्ये उभी करून ठेवलेली महिंद्रा पिकअप गाडीची चोरी अज्ञात चोरट्याने केल्याची घटना घडली आहे.

एलियाहु सिमशोन दिघोडकर ( वय ६० ) यांनी त्यांची ६०. ००० % रुपये किमतीची पांढऱ्या रंगाची महिंद्रा कंपनीची पिकअप क्रमांक एम एच १४ ए झेड २३५५ हि गाडी सदर ठिकाणी उभी ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरट्यानी चोरून नेल्याने या बाबतचीतक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# जागर तंबाखूमुक्तीचा पुस्तकाचे प्रकाशन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मच्छिंद्रनाथ म्हात्रे यांच्या जागर तंबाखूमुक्तीचा या पुस्तक प्रकाशनाचा सोहळा २९ मे रोजी स.रा. पाटील गुरुजी निवासस्थान वशेणी येथे दुपारी तीन वाजता करण्यात येणार आहे.

यावेळी समिधा निलेश म्हात्रे, सभापती पंचायत समिती उरण, रायगड भूषण प्रा. एलबी पाटील, साई संस्थान वहाळचे रवि पाटील, आणि जिल्हा आरोग्य अधिकारी सुधाकर मोरे उपस्थित राहणार आहेत. या पुस्तक सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# तळा- विविध विकासकामांचा शुभारंभ पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांच्या हस्ते संपन्न

**दै.रायगड नगरी । तळा**

मागील सरकारच्या काळात विकास खुंटला होता. राज्य शासनाकडून शहर आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी मदत मिळाली नव्हती. परंतु राज्यामध्ये महाविकास आघाडी सरकार आल्यानंतर पालकमंत्री अदिती तटकरे यांनी तळा शहराच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खेचून आणण्यास सुरुवात केली असताना ग्रामीण भागात देखील विकासकामे जोमाने सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून कासेवाडी येथील नळ पाणीपुरवठा योजनेचे आणि कासेवाडी येथील अंतर्गत रस्त्याचे उद्घाटन व त्याच प्रमाणे शेणाटे येथील अंगणवाडीचे देखील उद्घाटन पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांच्या शुभहस्ते पार पडले.

विकासकामांच्या उद्घाटना निमित्ताने ग्रामस्थांनी केलेल्या मागण्या देखील पूर्ण करण्याचे आश्वासन ना.अदिती तटकरे यांनी यावेळी दिले. आपले मनोगत व्यक्त करताना त्यांनी सांगितले की तटकरे साहेब जिल्हा परिषद अध्यक्ष असल्यापासून या तालुक्याला झुकते माप दिले. श्रीवर्धन मतदार संघातून



प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली यात तळा तालुक्याचा खूप मोठा वाटा आहे. म्हणूनच अनिकेत भाई असेल मी असेन आम्हा दोघांना विकासकामांचा झंझावात या तालुक्यात आणि जिल्ह्यात कायम ठेवता आला यात आता खंड पडणार नसल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या उद्घाटन समारंभास राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष नाना भौड, महिला अध्यक्षा जान्हवी शिंदे, मागास-वर्गीय सेल रायगड जिल्हा अध्यक्ष ॲड. उत्तम जाधव, राजीप सदस्य बबन चाचले, समन्वय समिती अध्यक्ष चंद्रकांत राऊत, शेणवली ग्रामपंचायत सरपंच निकिता गायकवाड, युवक अध्यक्ष नागेश लोखंडे, कैलास पायगुडे, जगदीश शिंदे, संदेश वाजे ग्रामस्थ महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिम्मत केल्याशिवाय काहीही मिळत नाही असा नेहमीचा अनुभव आहे. : राजन विचारे



**दै.रायगड नगरी । कर्जत**

'सरकारच्या अनेक योजना सर्वसामान्यांपर्यंत जात नाहीत. या योजना शिवसैनिकांनी सर्वसामान्यांपर्यंत जाऊन सांगाव्यात. या परिसरासाठी दुग्ध व्यवसायाची योजना उपयुक्त आहे. त्या समजून घेणे गरजेचे आहे. आपल्यात मतभेद आणू नका. या मतदार संघात ठीक ठिकाणी शिवसेनेचा भगवा फडकेल. चांगले नियोजन करा कोणतीही अडचण येणार नाही. हिम्मत केल्या शिवाय काहीही मिळत नाही असा अनुभव नेहमीच अनुभवास येतो.' असे महत्वपूर्ण प्रतिपादन खासदार राजन विचारे यांनी येथे केले.

कर्जत तालुक्यातील पोसरी येथील सुरभी सभागृहात शिवसेनेच्या वतीने दुसऱ्या शिव संपर्क अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खासदार राजन विचारे, जिल्हा संपर्क प्रमुख बबन पाटील, जिल्हा प्रमुख मनोहर भोईर, सह संपर्क प्रमुख विजय पाटील, आमदार महेंद्र थोरवे, जिल्हा महिला संघटिका रेखा ठाकरे, संतोष विचारे, शिवराम बदे, सुनील पाटील, उल्हास भुर्के, मनोहर थोरवे, पंकज पाटील आदी उपस्थित होते.

उप जिल्हा प्रमुख भाई गायकर यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. तालुका प्रमुख उत्तम कोळंबे यांनी प्रास्ताविकात, 'आमच्या तालुक्यात औद्योगिक क्षेत्र नाही त्यामुळे ग्रीन इंडस्ट्रीज करण्यासाठी प्रयत्न केल्यास रोजंदारीचा प्रश्न सुटेल.' असे सांगितले. मनोहर भोईर यांनी, 'शिवसेनेशी गद्दारी करू नका. गद्दारांना क्षमा करणार नाही. आमदार महेंद्र थोरवे यांनी आपल्या मनोगतात, 'शिव संपर्क अभियान म्हणजे शिवसेनेचे स्वबळ वाढविणे. शासनाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचविण्याची सुवर्णसंधी आपल्याला आहे. माझ्या सारखा कोणतीही निवडणूक न लढविलेला एक साधा शिवसैनिक आमदार होऊ शकतो हे शिवसेनेमध्येच घडू शकते. हा मतदार संघ आदिवासी बाहुल आहे. येथे वेगळे काम करावे लागेल. रिलायन्स ने टाकलेली गॅस पाईपलाईन टाकली आणि हजारो एकर शेत जमीन नापीक झाली आहे. यातून मार्ग काढावा.' असे सूचित केले.

संपर्क प्रमुख बबन पाटील यांनी, 'गट तट ठेवू नका एकच गट 'शिवसेना' असा निर्धार करा. आपल्या मुख्यमंत्री, खासदार, आमदार यांची कामे गावा गावात सांगा. तुम्हाला निवडणुकीला सोपे जाईल. पक्षनिष्ठेने काम करीत त्याला नक्की फळ मिळेल. भावाचे मुख्यमंत्री पद ज्याला बघवत नाही त्याला देव कसा कळेल. भाजपच्या नादी लागलेल्या एकाला श्रीरामानेच अयोध्येत येऊ नये असे सांगितले. 'आता काय राहलय त्याच' असा टोला राज ठाकरे यांना दिला. सह संपर्क प्रमुख विजय पाटील, जिल्हा महिला संघटिका रेखा ठाकरे यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. सूत्रसंचालन अभिषेक सुर्वे यांनी केले. याप्रसंगी सुधाकर देसाई, बाळाजी विचारे, अंकुश दाभणे, संकेत भासे, बाबू घारे, किसन शिंदे मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# होल्डिंग पॉडमधील पाणी कळंबोलीत ; जलधारण तलावातील मार्गीकांना झाकणेच नाही

## नगरसेवक सतिश पाटील यांचे कार्यकारी अभियंत्यांना पत्र

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोलीतील सिंग सिटी हॉस्पिटल समोरील होल्डिंग पॉडवरमधील मार्गिकांवर झाकणे नसल्याने येथील बॅक वॉटर वसाहतीमध्ये जात आहे. पावसाळ्यात तर त्यामुळे अनेकदा पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होते. मात्र सिडकोकडून याबाबत कोणत्याही उपाययोजना होताना दिसत नाहीत . आ-पत्ती व्यवस्थापन अंतर्गत प्राधिकरण किती दक्ष आहे याचा प्रत्यय या ठिकाणी येतो. कळंबोलीत माघारी पाणी येऊ नये म्हणून त्या ठिकाणी पावसाच्या अगोदर झाकणे लावण्यात यावेत अशी मागणी नगरसेवक सतिश पाटील यांनी केली आहे. याबाबत त्यांनी कार्यकारी अभियंत्यांना पत्र दिले आहे.

कळंबोली वसाहतीतील पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी सिंग सिटी हॉस्पिटल येथे जल-तरण तलाव आहे. या ठिकाणी पावसाच्या नाल्यातून पाणी सोडले जाते. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यास मदत होते. त्यात कळंबोली वसाहत खाली असल्याने हे होल्डिंग पाँड अत्यंत महत्त्वाचे आहे. वसाहतीत साचणारे पावसाचे पाणी येण्यासाठी येथे होल्डिंग पाँडला जवळपास ४४ मार्गिका आ-हेत.हे पाणी वसाहतीमध्ये परत येऊ नये यासाठी सुरुवातीला जलधारण तलावातील मार्गींना झाकणे



बसवण्यात आले होते. जेणेकरून वसाहतीतून पाणी आत मध्ये येत असतानाही ही झाकणे उघडतात आणि बॅकवॉटरला प्रतिरोध करतात. मात्र जवळपास ३५ मार्गिकांना आता झाकण नसल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यामुळे जलधारण तलावातील पाणी वसाहतीमध्ये येत आहे. विशेष करून भरतीच्या वेळी मोठ्या प्रमाणात पाणी या परिसरामध्ये घुसत आहे. पावसाळ्यात तर जनजीवन आणखी विस्कळीत होते. संबंधित जलधारण तलावाकडे सिडकोचे कोणतेही लक्ष नसल्याची वस्तुस्थिती समोर आली आहे. आपत्ती व्यवस्थापनबाबत प्राधिकरण गंभीर नसल्याचे एक प्रकारे दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकांना त्याचा त्रास होत असून पावसाळ्यात त्यांना जीव मुठीत घेऊन राहावे लागत आहे. मान्सुनच्या अगोदर होल्डिंग पाँडच्या सर्व मार्गिकांना झाकणे बसवण्यात यावेत त्याचबरोबर पंप हाऊस मधील सगळे पंप दुरुस्त करून घेण्यात यावेत अशी मागणी नगर-सेवक सतिश पाटील यांनी सिडकोचा कार्यकारी अभियंत्याकडे केली आहे.

> कळंबोलीत असलेल्या या जलधारण तला-वातून पाणी आत मध्ये वसाहतीमध्ये येत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे संबंधित मार्गिकाना झाकण्यास नसल्याचे पाहणी केल्यानंतर निदर्शनास आले. सिडकोला काहीच माहिती नाही. हे सर्वात मोठे दुर्दैव आहे. आपत्ती व्यवस्थापनाबाबत ते अजिबात गंभीर नाहीत. त्यानुसार कार्यकारी अभियंता यांना पत्र दिले आहे. जर याबाबत उपाययोजना केल्या गेल्या नाहीत. आणि त्याचा पावसाळ्यात वसाहतीवर परिणाम झाल्यास याला संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल. त्यांच्या विरोधात रहिवासी मोर्चा काढल्याशिवाय स्वस्थ बसणार नाहीत.
>
> **सतिश मोहन पाटील, नगरसेवक पनवेल मनपा**

# पाणी पुरवठा आणि स्वच्छता अभियान राबविण्यात म्हसळा नगरपंचायत अपयशी

## काँग्रेस-सेना युतीतर्फे आमरण उपोषण सुरु

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

मागील पाच वर्षे आणि नव्याने स्थापित झालेल्या म्हसळा नगरपंचायतीची एक हाती सत्ता राष्ट्रवादी काँग्रेसच्या हाती आसून पक्षाच्या वरिष्ठ मंडळीने जनतेला विकासाची मोठ मोठी आश्वासन दिली असली तरी म्हसळा नगरपंचायतीचे सत्त-ाधारी पाणी पुरवठा आणि स्वच्छता अभियान राबविण्यात कमी पडली असुन त्यांना या कामी अपयश आले असल्याचा आरोप म्हसळा नगरंचायतीचे विरोधी पक्षनेते डॉ.मुविज शेख यांनी केला आहे.

पाणी पुरवठा योजनेचे काम पुर्ण करूनही म्हसळा शहरात तीव्र पाणीटंचाई परिस्थिती आहे तसेच स्वच्छता अभियान राबविण्यात नगर पंचायत प्रशासनाला अपयश आले असल्याने या कामी पुढील तीन दिवसांत व्यवस्थापन करावे यासाठी गेल्या आठवड्यात शिवसेना -काँग्रेस च्या नगरसेवकांनी मुख्याधिकारी यांना मागण्यांबाबत लेखी निवेदन दिले होते. परंतू आजपर्यंत मागण्यांचा विचार न झाल्यामुळे शिवसेना-काँग्रेस चे नगरसेवक यांनी नगरपंचायती समोर बसून आमरण उपोषण सुरु केले. यामध्ये प्रामुख्याने विरोधी पक्षनेते डॉ. मुईज शेख, नगरसेवक सुफियान हलदे, सेनेचे गटनेते अनिकेत पानसरे, नगरसेविका राखी अजय करंबे उपोषणास बसले. त्यांच्या समवेत माजी तालुका प्रमुख नंदू शिर्के, जहूर हुरझुक, म्हसळा शहर काँग्रेस महिला अध्यक्षा नाजिमा मुकादम, काँग्रेसचे कार्यकर्ते रिजवान मुकादम, सेना पदाधिकारी अजय करंबे, विशाल सायकर, दीपल शिर्के, बाळा मेंदाडकर, बाबू बनकर आदि मान्यवर उपस्थित होते.

